निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

[illegible]

अंक – २०७ वा
मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५

[illegible] | [illegible] | [illegible] | RNI.No.MAH/MAR2011/39247

# डॉ. प्रकाश आमटे यांनी आदिवासींना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. प्रकाश आमटे यांना लोकनेते स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील जनसेवा पुरस्कार प्रदान

धुळे दि.२९ (प्रतिनिधी)– आरोग्य, शिक्षण, शेती, जलसंधारण या क्षेत्रात प्रयोगशीलतेच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनात मोठे परिवर्तन घडविण्याचे, त्यांच्यातील आत्माभिमान जागृत करण्याचे आणि त्यांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देण्याचे काम डॉ. प्रकाश आमटे यांनी केले. त्यामुळे जीवनाचे समर्पण लोकसेवेसाठी केलेल्या स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या नावाने असलेला पुरस्कार डॉ. प्रकाश आमटे यांना दिल्याने या पुरस्काराची उंची वाढली आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

लोकनेते, माजी मंत्री स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त अभिवादन व लोकनेते स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील जनसेवा पुरस्कार मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ.प्रकाश आमटे यांना श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मध्य प्रदेशचे मंत्री कैलास विजयवर्गीय, पणन मंत्री जयकुमार रावल, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खासदार स्मिता वाघ, डॉ. शोभा बच्छाव, मंदाकिनी आमटे, लता पाटील, माजी आमदार कुणाल पाटील, लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील सामाजिक कृतज्ञता ट्रस्टचे अध्यक्ष विनय पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, बाबा आमटे यांनी कुष्ठरोगी आणि आदिवासी समाजासाठी मोठे कार्य केले. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून एकतेचा विचार देशभर पोहोचविला. जिथे जाण्यासाठी रस्ताही नव्हता, अशा हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पाच्या कामासाठी मंदाकिनी आमटे यांनीही डॉ. प्रकाश आमटे यांना समर्थ साथ दिली. आमटे परिवारातील तिसरी पिढी या प्रकल्पांसाठी कार्यरत आहे. अनेक अडचणींतून मार्ग काढत डॉ. आमटे यांनी अविरतपणे हा प्रकल्प सुरू ठेवला आहे आणि पुढेही सुरू रहावा, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या स्मृतीस वंदन करण्यासाठी आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, विधानसभेत त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्वाचा परिचय झाला. विविध विषयांची जाण असतानाही त्यांचा स्वभाव विनम्र होता. विधानमंडळात संघर्षाची वेळ आली तरी शांतपणे एखादा मुद्दा हाताळण्याचे कसब त्यांच्यात होते. त्या काळात राज्याच्या विधानसभेत सर्वसमावेशक नेत्यांमध्ये दाजीसाहेबांचा समावेश होता.

दाजीसाहेबांनी खानदेशच्या विकासाचा विचार सतत मनात ठेवून त्यासाठी संघर्ष उभा केला. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे प्रयत्न राज्य शासनाच्या माध्यमातून होत आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सुलवाडे-जामफळसारख्या प्रकल्पाने धुळे तालुक्याचा संपूर्ण कायापालट येत्या काळात होणार आहे. मनमाड–इंदूर रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र सरकारने निधी मंजूर केला आहे. सहा राष्ट्रीय महामार्ग आणि मनमाड–इंदूर रेल्वे यामुळे येत्या काळात धुळ्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे. अक्कलपाडा प्रकल्प १०० टक्के भरावा म्हणून भूसंपादनासाठी आवश्यक निधी देण्यात येईल.

राज्यातील पूरपरिस्थितीची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना देण्यासोबत राज्यात संरक्षण कॉरिडॉर निर्माण करण्यासाठी विनंती केली आहे. त्यातील एक कॉरिडॉर नाशिक आणि धुळे आहे. यामुळे धुळ्यातील तरुणांच्या हाताला मोठ्या प्रमाणात काम मिळेल. धुळ्यासोबत नंदुरबारमध्येही गुंतवणूक येत आहे. १५ ते २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या परिसरात येत आहे. उत्तर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांना औद्योगिक महत्व येण्यासाठी राज्य शासन ताकदीने उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

मध्यप्रदेशचे मंत्री श्री. विजयवर्गीय म्हणाले, स्व. दाजीसाहेबांना समाजकार्याचा वारसा वडिलांकडून मिळाला होता. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात बहुमोल कार्य केले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे, आरोग्यसाठी सुविधा उभारणे असे विविधांगी आणि प्रेरणादायी कार्य त्यांनी केले. त्यांच्या स्मृतीत समाजसेवेसाठी पुरस्कार सुरू करणे अभिनंदनीय बाब आहे. जनेसेवेचे हे कार्य असेच पुढे जावे, असे त्यांनी सांगितले. बाबा आमटे हे अद्भुत व्यक्तिमत्वाचे धनी होते. कुष्ठरोग्यांमध्ये राहून त्यांची सेवा करण्याचे त्यांचे कार्य अतुलनीय होते. त्यांचे हे कार्य डॉ.प्रकाश आमटे यांनी पुढे नेल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. आमटे म्हणाले, बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांची सेवा करून त्यांच्या मनात स्वाभिमान निर्माण केला. त्यांचे हे कार्य जगभरात पोहोचले. त्यांच्या कामाचे महत्त्व लक्षात आल्यावर आम्ही दोन्ही भावांनी आनंदवनाचे कार्य पुढे नेण्याचे निश्चित केले. भामरागड येथे बाबांसोबत भेट दिल्यानंतर आदिवासी जनतेतील कुपोषण, त्यांच्या समस्या पाहून त्यांच्या उत्थानाच्या कार्याला वाहून घेण्याचा निश्चय केला. त्यातूनच लोकबिरादरी प्रकल्पाची कल्पना पुढे आली. लोकांच्या सहकार्य आणि विश्वासातून हे कार्य पुढे गेले. आज अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रात या परिसरातील



तरुण पुढे गेले आहेत. गेली ५२ वर्षे हे जनसेवेचे हे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

स्व.दाजीसाहेबांनी राजकारणासोबत समाजकारण करताना समाजसेवेचा वारसा पुढे नेला असेही डॉ.आमटे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल पाटील यांनी केले. स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या कार्यातून नागरिकांना समाजसेवेची प्रेरणा मिळावी यासाठी हा पुरस्कार सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सुलवाडे–जामफळ योजनेचे स्वप्न स्व.दाजीसाहेब रोहिदास पाटील यांनी

पाहिले होते. राज्य शासनाच्या प्रयत्नातून ही योजना पूर्ण होणार असल्याने त्यांचे स्वप्न पूर्ण होईल, असेही श्री. पाटील यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या कार्यावर आधारित स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार अमरिशभाई पटेल, आमदार सत्यजित तांबे, आमदार काशिराम पावरा, आमदार दिलीप बोरसे, आमदार मंजुळाताई गावित, आमदार अनुप अग्रवाल, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील आणि अण्णासाहेब चुडामण पाटील यांच्या समाधीवर पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान माण–खटाव तालुकास्तरीय कार्यशाळेचे मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन

सातारा दि.२९ (प्रतिनिधी)– भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गाव–खेड्यांचा विकास सुरू असून ग्रामस्थांनी देखील याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. हे अभियान म्हणजे ग्रामविकासाची चळवळ आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत येत्या १०० दिवसात विकासाची मोठी चळवळ संपूर्ण राज्यात उभी राहील, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

गोंदवले बुद्रुक येथील शेतकरी भवन कार्यालय येथे आज ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. यावेळी ते बोलत होते. यावेळी माणच्या उपविभागीय अधिकारी उज्वला गाडेकर, तहसीलदार विकास अहिर, माण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे, पंचायत समिती खटाव (वडूज) गटविकास अधिकारी योगेश कदम यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

गावच्या विकासासाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावकरी व ग्रामविकास अधिकारी यांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे असे सांगून मंत्री श्री. गोरे म्हणाले, प्रत्येक गाव सर्वार्थाने समृद्ध होण्यासाठी, केंद्र आणि राज्याच्या सर्व योजनांची १०० टक्के अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. यासाठी योजनांची अमंलबजावणी करणाऱ्या लोकप्रतिनिधींसह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन योगदान देणे गरजेचे आहे. शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी केली तर गावची कामे यशस्वीरित्या मार्गी लागतील. राज्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याकरिता तालुका जिल्हा महसूल विभाग व राज्यस्तरावर

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभिमान राबवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. येत्या १०० दिवसांत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान मोठी चळवळ म्हणून उभी राहील असे काम करा, असे आवाहनही श्री. गोरे यांनी केले.

या कार्यशाळेत पंतप्रधान घरकुल आवास योजना टप्पा २ अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना तुकडेबंदी कायद्यांतर्गत खटाव तालुक्यातील १८ माण तालुक्यातील ५ लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करुन दिली आहे, त्याचे पत्र ग्रामविकास मंत्री श्री. गोरे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आले. तसेच ३५ दिवसाच्या विक्रमी कालावधीत घरकुल पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचा सत्कार मंत्री गोरे यांनी केला.

प्रारंभी संत गाडगेबाबा महाराज, संत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

# फुल उत्पादक शेतकरी कंपन्यांकरिता स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करा–पणन मंत्री जयकुमार रावल

पुणे दि.२९ (प्रतिनिधी)– फुल उत्पादक शेतकरी कंपनी यांच्यासाठी संस्था परिसरात किंवा थेट शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम घ्यावेत, यामुळे फुल निर्यातीस चालना मिळेल, असे निर्देश पणन मंत्री तथा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी आढावा बैठकीत दिले.

यावेळी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे सचिव तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सर व्यवस्थापक विनायक कोकरे, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक मिलिंद आकरे, व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे



येथे त्रिभुवन सहकार विद्यापीठाचे उपकेंद्र लवकरच सुरू करण्यात येईल, यामुळे संस्थेच्या उत्पन्नवाढीस मोठी चालना मिळेल. नेदरलँड, इस्रायल, जपान व तांजानिया येथील विद्यापीठांचे सहकार्य घेत फुल उत्पादक शेतकऱ्यांकरिता आंतरराष्ट्रीय पातळीववरील प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत.

आफ्रिका खंडाअंतर्गत येणाऱ्या देशामधील कृषी विभागाशी संपर्क साधून तेथील शेतकऱ्यांना या संस्थेमध्ये किंवा त्या देशामध्ये जाऊन प्रशिक्षण द्यावे. इतर राज्यांच्या कृषी, फलोत्पादन विभागांशी संपर्क साधून त्या राज्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना संस्थेत प्रशिक्षण द्यावे.

राज्यातील साखर कारखान्यांना संस्थेचे सभासद करुन त्यांच्या कार्यक्षेत्रामधील शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम घेणे. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण राबवावे. संस्थेच्यावतीने कृषी पर्यटन व नॅचरोपॅथीसारखे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करावेत. बांबू मूल्यवर्धन केंद्राच्या बांबू सायकलचा प्रायोगिक तत्वावर वापर करण्याबाबत श्री. रावल यांनी मार्गदर्शन केले.

मंत्री श्री. रावल यांनी संगणकीकृत वर्गखोल्या (डिजिटल क्लासरूम), उपहारगृह इमारत, शीतगृह विस्तारित इमारतीची पाहणी केली. निवासी सुविधा, एम.बी.ए. महाविद्यालय, पी.टी.सी. प्रयोगशाळा, माती व पाणी तपासणी प्रयोगशाळा यांची माहिती देण्यात आली. श्री. आकरे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती दिली तसेच मार्च २०२६ पर्यंतचा प्रशिक्षण आराखडा सादर केला.

# स्थानिक पातळीवर समस्याचे निराकरण करण्यात येणार–पालकमंत्री गणेश नाईक

पालघर दि.२९ (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी वरिष्ठस्तरावर जाण्याची आवश्यकता नाही, स्थानिक पातळीवर समस्याचे निराकरण करण्यासाठी या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. विक्रमगड येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या जनता दरबारामध्ये नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

यावेळी आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे ,सहाय्यक जिल्हाधिकारी अपूर्वा बासूर, विशाल खत्री,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी भवानजी आगे पाटील, जव्हार, उपवनसंरक्षक सैपुन शेख, डहाणू, उपवनसंरक्षक निरंजन दिवाकर, विश्वनाथ पाटील, तसेच वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री गणेश नाईक यांनी विक्रमगड येथे आयोजित जनता दरबारात नागरिकांशी संवाद साधताना स्पष्ट केले की, मागील काही वर्षांत मध्ये विकास कामाबाबतीत अनियमित्ता झाल्याच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या असून या तक्रारींबाबत माहिती घेऊन सर्व कामांची चौकशी करण्यात येईल, अनियमित्ता आढळून आल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.

या जनता दरबारात जवळपास १७० निवेदन प्राप्त झाले या मध्ये. रस्ते, वीजपुरवठा, पाणी, शिक्षण व्यवस्था, शाळांची पडझड, आरोग्य सेवा, जमीन अधिग्रहण व मोबदला यासारख्या प्रश्नांवर नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या असल्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी




सांगितले.

पालघर जिल्ह्य मध्ये १ कोटी झाडे लावण्यात येणार, बाबू लागवडी मध्ये जिल्हा प्रगतीपथावर आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या बाबतीत समन्वयाने काम करणार आहे.

जिल्ह्यामध्ये विकास कामासाठी सर्व विभागांना योग्य निधी वाटप करून तातडीने विकास कामे राबवली जाणार आहेत. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वसामान्य माणसाच्या अडचणी सोडवणे ही शासनाची भूमिका आहे.

ग्रामविकास, वनहक्क, जमीन मोबदला, टॉवर व गॅस पाईपलाईन प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विशेष लक्ष दिले जाईल.

पावसाची परिस्थिती पाहता आरोग्य केंद्रांत आवश्यक औषधसाठा उपलब्ध असावा, शाळांमध्ये अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेची काळजी घ्यावी जिल्ह्यातील नादुरुस्त रस्त्यांच्या कामाला गती द्यावी असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## संपादकीय

# इस्टोनियाची रशियन भीती

रशियन माध्यमाच्या शाळा बंद करण्याचा निर्णय इस्टोनियानं घेण्यामागे रशिया-युक्रेन युद्धाचा काय संबंध आहे? रशियानं युक्रेनवर आक्रमण करणं आणि इस्टोनियानं आपलं भाषा धोरण ठरवणं या दोन वेगळ्या घटना; परंतु त्या परस्परांशी संबंधित आहेत! या संबंधाच्या मुळाशी आहे, रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचा आक्रमकपणा आणि त्यांची विस्तारवादी भूमिका. युक्रेनच्या विरोधात युद्ध सुरू करताना पुतिन यांनी जी अनेक कारणं दिली, त्यांपैकी एक होतं युक्रेनमधील रशियन भाषकांचं. हेच कारण आपल्या विरोधातही पुतिन वापरू शकतात, याची भीती इस्टोनियाला आहे; कारण तिथं २८ टक्के रशियन भाषक आहेत. रशियाच्या सीमेलगतच्या नारव्हा या इस्टोनियातील शहरात तर हे प्रमाण तब्बल ९० टक्के आहे. अल्पसंख्याक रशियन भाषकांना देशाची अधिकृत असलेली इस्टोनियन भाषा शिकविण्यास भाग पाडल्यास त्यांच्या संधी वाढतील, ते मुख्य प्रवाहात येतील आणि त्यामुळे रशियाला त्यांचं निमित्त मिळणार नाही, असा विचार करून इस्टोनियानं आपलं भाषाधोरण आखलं आहे. इस्टोनियाचं हे धोरण मुळात त्याच्या व्यापक शिक्षण धोरणाचा एक भाग असून, त्यात इस्टोनियन माध्यमाच्या शिक्षणावर भर आहे. तिथं सध्या रशियन माध्यमाच्या शाळा असल्या, तरी त्या टप्प्याटप्प्याने बंद केल्या जात आहेत. २०३०नंतर तिथं रशियन माध्यमाची एकही शाळा नसेल. तेथील रशियन भाषकांत यामुळे काही प्रमाणात अस्वस्थता असली, तरी त्याची तीव्रता फार नसल्याचा दावा केला जात आहे. 'इस्टोनियाची राष्ट्रीय ओळख ही त्याच्या भाषेतूनच निर्माण होऊ शकते; आणि त्यामुळे ती देशातील सर्वांनी शिकायलाच हवी,' अशी भूमिका तेथील शिक्षणमंत्री क्रिस्तिना कालस यांनी मांडली आहे. स्वातंत्र्यानंतर लगेचच अशा प्रकारचं धोरण घ्यायला हवं होतं; परंतु रशियाच्या प्रभावामुळे तसं करता आलं नाही, असंही त्यांनी एका मुलाखतीत म्हटलं होतं. रशियानं युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर मात्र आपली राष्ट्रीय अस्मिता टोकदार करण्यासाठी, तसंच अल्पसंख्याकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भाषाधोरणाचं पाऊल उचलणं भाग होतं, असं त्या सांगतात. बाल्टिक देशांपैकी एक असलेला हा देश सोव्हिएत साम्राज्याचा एक भाग होता. सोव्हिएतचा घटक होण्याच्या आधी इस्टोनियन हीच तेथील अधिकृत भाषा होती. सोव्हिएत कालखंडात त्याला रशियन भाषेचा स्वीकार करावा लागला. सोव्हिएत हुकूमशहा जोसेफ स्टालिन यांनी इस्टोनिया, लिथुएनिया, लॅटिव्हा आदी बाल्टिक देशांमध्ये रशियन सैनिक आणि कामगार यांच्या वसाहती जाणीवपूर्वक वसवल्या. यामुळे तिथं रशियन भाषकांची संख्या वाढत गेली. इस्टोनियातील प्रमुख शहरांत रशियन भाषकांचं प्रमाण अशा प्रकारे वाढलं. सोव्हिएत साम्राज्य कोसळल्यानंतर १९९१मध्ये इस्टोनिया पुन्हा स्वतंत्र झाला. त्यानंतर इस्टोनियन ही एकमेव अधिकृत भाषा झाली; परंतु रशियन भाषकांचं प्रमाण अधिक असल्यानं त्या माध्यमातील शाळा सुरू राहिल्या. आपल्या भाषेतून शिकण्याची सोय असल्यानं रशियन भाषक इस्टोनियन शाळांत जाण्याचा प्रश्नही नव्हता. बारा लाखाच्या आसपास लोकसंख्या असलेल्या या देशात सुमारे तीन लाख रशियन भाषक असून, त्यांच्यावर रशियाचा प्रभाव वाढण्याची भीती इस्टोनियाला आताशा भेडसावू लागली आहे; त्याला कारण घडले ते रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाचे. इस्टोनिया या युरोपीय महासंघाचा, तसेच 'नाटो'चा सदस्य आहे. मात्र, रशियन प्रभाव कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज त्याला प्रकर्षानं भासतेय. भाषिक आणि सांस्कृतिक अस्मिता टोकदार करणं हा त्याचाच एक भाग. यामुळे रशियन अल्पसंख्याकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. 'रशियन भाषेची सोय काढून घेतल्यानंतर आमच्या मुलांना शिकणं अवघड होईल,' अशी प्रतिक्रिया काही रशियन पालक व्यक्त करतात; परंतु इस्टोनियन शिकली पाहिजे; त्या भाषेतून शिकल्यानंतर अधिक संधी मिळतात, असा विचार मांडणारेही आहेत. रशियन अल्पसंख्याकांना न डिवचता इस्टोनिया आपलं भाषाविषयक धोरण राबविताना दिसत आहे; त्यात त्याला कितपत यश येते, हे पाहावं लागेल.

# सौदी-पाक कराराचा भारतावर परिणाम किती?



सौदी अरेबिया आणि पाकिस्तानमध्ये अलीकडेच काही संरक्षणात्मक करार झाले आणि त्याचबरोबर सौदी अरेबियाने पाकिस्तानला मोठी आर्थिक मदत केली. दोन्ही देशांपैकी कोणत्याही देशावर झालेला हल्ला हा दोन्ही देशांवरचा हल्ला मानला जाईल, असे या करारात म्हटले आहे. या करारामुळे पाकिस्तानला भारतावर तर सौदी अरेबियाला इराणवर दबाव आणायचा आहे, हे स्पष्ट आहे; मात्र भारताला फार भीती बाळगण्याचे कारण नाही.

अलीकडेच सौदी अरेबिया आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या करारावर भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. या दोन्ही देशांमधील कराराचा अभ्यास करत असल्याचे सांगून भारताने कराराला सावधपणे प्रतिसाद दिला. भारताचे सौदी अरेबियाशी संबंध मजबूत आहेत. याच वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियाचा दौरा केला. भारत आणि सौदी अरेबियाचा द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे. सौदी अरेबिया भारताला आपल्या २० टक्क्यांपेक्षा जास्त कच्च्या तेलाची निर्यात करतो. एप्रिल २०२५ मध्ये दोघांनी एक संरक्षण सहकार्य समिती स्थापन केली. त्यात संयुक्त सरावांचा समावेश आहे. आता पाकिस्तानबरोबर सौदी अरेबियाचा करार झाला असला आणि पाकिस्तानचे नेते कराराबद्दल काहीही सांगत असले, तरी सौदी अरेबिया भारतासोबत संतुलन राखेल. सौदी अरेबिया पाकिस्तानची युद्धे लढणार नाही; परंतु इराणसारख्या प्रादेशिक प्रतिस्पर्ध्यांशी सामना करण्यास मदत करेल. भारत आणि पाकिस्तान पुन्हा भिडले, तर सौदी अरेबिया आर्थिक दबाव आणू शकतो; परंतु थेट लष्करी हस्तक्षेप करण्याची शक्यता कमी आहे. या संरक्षण करारात दोन्ही देशांविरुद्ध होणारा कोणताही हल्ला हा दोघांविरुद्धचा हल्ला मानला जाईल, असे म्हटले आहे. कतारवरील इस्रायली हल्ल्यानंतर आठ दिवसांनी पाकिस्तान आणि सौदी अरेबियामध्ये हा करार झाला. एकीकडे हा करार इस्रायलला शह देण्यासाठी असल्याचे चित्र रंगवले जात असले, तरी पाकिस्तान आणि सौदी अमेरिकेच्या विरोधात जाण्याचे धाडस करणार नाही. सौदी अरेबिया परस्पर हितसंबंध आणि संवेदनशीलता लक्षात घेईल, अशी अपेक्षा या करारानंतर भारताने व्यक्त केली आहे.

पाकिस्तान आणि सौदी अरेबियाचे संबंध परस्पर गरजांवर आधारित आहे. सौदी अरेबिया आर्थिक मदत पुरवतो आणि पाकिस्तान लष्करी मदत पुरवतो. पाकिस्तान सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील लष्करी प्रयत्नांमध्ये सहभागी आहे. २०१५ पासून पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख राहिल शरीफ इस्लामिक लष्करी दहशतवादविरोधी युतीचे नेतृत्व करत आहेत. २०१८ मध्ये पाकिस्तानने येमेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षात सौदी अरेबियाला मदत करण्यासाठी सैन्य पाठवले. असा अंदाज आहे, की बाराशे ते दोन हजार पाकिस्तानी लष्करी जवान आधीच सौदी अरेबियामध्ये तैनात आहे. त्या बदल्यात पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून आर्थिक मदत मिळत राहील. भविष्यात भारताशी कधी संघर्ष झाला तर सौदी अरेबिया काही मदत करेल, अशी पाकिस्तानला आशा आहे. पाकिस्तान आणि सौदी अरेबियामधील 'स्ट्रॅटेजी म्युच्युअल डिफेन्स ॲग्रीमेंट' म्हणजे काय, हे जाणून घेतले पाहिजे. भारताने सौदी अरेबियाच्या सशस्त्र दलांना प्रशिक्षण देण्याची ऑफर दिली आहे. भारत आणि सौदी अरेबियामधील भागीदारी अलीकडील काही महिन्यांमध्ये वाढली आहे. त्यात दोन्ही देशांमधील संयुक्त लष्करी सराव आणि संरक्षण मंत्रीस्तरीय समितीची स्थापना या पावलांचा समावेश आहे. हे त्यांच्या संबंधांच्या बळकटीकरणाचे प्रतीक आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू झाल्यावर तटस्थ राहण्याचा फायदा सौदी अरेबियाला झाला आहे.

या वर्षी मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष झाला, तेव्हा सौदी अरेबियाने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला; परंतु ऑपरेशन सिंदूरबाबत कोणतेही निवेदन जारी केले नाही. सौदी अरेबियासाठी पाकिस्तानपेक्षा भारत अधिक महत्त्वाचा आहे आणि भारतासोबतची त्याची आर्थिक आणि सामरिक भागीदारी महत्त्वाची आहे. पाकिस्तानसोबतच्या संरक्षण करारानंतरही वरिष्ठ सौदी अधिकाऱ्यांनी याचा पुनरुच्चार केला आहे. पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून सातत्याने मोठे आणि परवडणारे कर्ज मिळत आले आहे. अहवालांवरून दिसून येते, की मुळात एक वर्षासाठी दिलेले कर्ज पाकिस्तानने फेडलेले नाही. सौदी सरकारने पाकिस्तानप्रति उदारता दाखवली आहे आणि कोणतेही अतिरिक्त व्याज न आकारता दरवर्षी ही कर्जे वाढवत आहे. पाकिस्तानला मिळालेली सौदी अरेबियाची कर्जे चीनकडून घेतलेल्या कर्जांपेक्षा एक तृतीयांश स्वस्त आहेत आणि परदेशी व्यावसायिक कर्जांच्या किमतीच्या निम्मी आहेत. सौदी अरेबिया, चीन आणि संयुक्त अरब अमिरातीने तीन वर्षांच्या कार्यक्रमाच्या पूर्ततेपर्यंत पाकिस्तानला आपल्या रोख ठेवी ठेवण्याची अट घातली आहे. या देशांनी पाकिस्तानला एकूण बारा अब्ज अमेरिकन डॉलर्सचे कर्ज दिले आहे. तो पाकिस्तानी मध्यवर्ती बँकेच्या एकूण परकीय चलन साठ्याचा १४.३ अब्ज डॉलर्सचा भाग आहे. पाकिस्तान आणि सौदी अरेबिया एकत्र आले, तरी भारतावर संरक्षणात्मकदृष्ट्या फारसा परिणाम होणार नाही. 'ग्लोबल फायरपॉवर इंडेक्स'नुसार, भारताकडे जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात शक्तिशाली सेना आहे, तर पाकिस्तान बाराव्या क्रमांकावर आहे. सौदी अरेबिया २४व्या क्रमांकावर आहे. सौदी अरेबियाची ताकद अमेरिकन शस्त्रांमध्ये आहे. २०१५-२०२२च्या येमेन युद्धात हौथी बंडखोरांच्या ड्रोन हल्ल्यांमुळे सौदी अरेबियाला मोठे नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे त्यांचे हवाई संरक्षण काहीसे कमकुवत झाले. सौदी सैन्य परदेशी (पाकिस्तानी आणि अमेरिकन) सल्लागारांवर अवलंबून आहे आणि त्यांच्याकडे अंतर्गत प्रशिक्षणाचा अभाव आहे. भारतासाठी हा करार दुधारी तलवार आहे. एकीकडे, भारत आणि सौदी अरेबियाचे मजबूत आर्थिक संबंध आहेत.

भारत सौदी अरेबियासोबत शंभर अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त व्यापार करतो. पाकिस्तानसोबत करार झाल्यानंतरही सौदी अरेबियाने स्पष्ट केले आहे, की भारतासोबतचे त्यांचे संबंध मजबूत राहतील आणि हा करार भारताविरुद्ध नाही. भारताने या करारावर संयमी भूमिका घेतली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे, की भारत कराराचा अभ्यास करेल आणि प्रादेशिक स्थिरतेसाठी वचनबद्ध राहील. असे असले तरी हा करार भारताला त्याच्या संरक्षण क्षमता मजबूत करण्याची संधी प्रदान करतो. क्वाड (भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया) सारख्या युती मजबूत करणे, अंदमान आणि निकोबार बेटांमध्ये संरक्षणविषयक पायाभूत सुविधा विकसित करणे आणि नौदल गस्त वाढवणे आवश्यक आहे. ओमान, यूएई आणि बहरीनसारख्या मध्यममार्गी आखाती देशांशीही भारत संबंध मजबूत करू शकतो. भारताने ऊर्जा विविधीकरणासाठी अक्षय स्रोतांवरही भर दिला पाहिजे. अलीकडेच इस्रायलने सौदी अरेबियाच्या सीमेला लागून असलेल्या कतारची राजधानी दोहावर हल्ला केला. या हल्ल्यावर अमेरिकेने बाळगलेल्या मौनामुळे आखाती देशांमध्ये अमेरिकेच्या सुरक्षा हमींबद्दल शंका निर्माण झाल्या. पश्चिम आशियात अमेरिकेचे अंदाजे ४० ते ५० हजार सैन्य तैनात आहे; परंतु इस्रायली आक्रमणासमोर अमेरिकेच्या निष्क्रियतेमुळे सौदी अरेबियाला पर्यायी सुरक्षा भागीदार शोधण्यास भाग पडले. या संदर्भात, मुस्लीम जगतातील एकमेव अण्वस्त्रधारी देश असलेला पाकिस्तान सौदी अरेबियासाठी आकर्षक मित्र बनला. सौदी आणि पाकिस्तानच्या करारात संरक्षण उद्योग सहकार्य, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि लष्करी सह-उत्पादन यांचा समावेश असल्यामुळे दोन्ही देशांच्या लष्करी क्षमता बळकट होतील. पश्चिम आशियातील इस्रायली आक्रमण आणि इराणशी तणावाच्या दरम्यान, सौदी अरेबियाला एका मजबूत मित्राची आवश्यकता होती, तर पाकिस्तानला ते आर्थिक आणि सामरिक फायद्याचे स्रोत म्हणून दिसले.

पाकिस्तानला सौदी अरेबियाकडून तेल पुरवठा, गुंतवणूक आणि लष्करी मदत मिळू शकते. यामुळे युद्धप्रसंगी पाकिस्तानची शक्ती वाढेल. भारताने पाकिस्तानवर हल्ला केल्यास सौदी अरेबिया प्रत्युत्तर देऊ शकतो. सौदी तेल आयातीवरील अवलंबित्व पाहता, या कराराचा भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत भारताला रशिया आणि इतर स्रोतांकडून विविधीकरणाला गती द्यावी लागेल. पश्चिम आणि दक्षिण आशियातील सत्तेचे संतुलन बदलणारा हा करार भारतासाठी धोक्याची घंटा आहे. परिणामी, भारताला आपल्या राजनैतिक आणि संरक्षण धोरणांमध्ये बदल करावे लागतील. तथापि, मजबूत नेतृत्व आणि धोरणात्मक स्वायत्ततेसह, भारत हे आव्हान पेलू शकतो.

**- आरिफ शेख**

***

# गडचिरोली : निसर्ग पर्यटनाचा अनमोल ठेवा

गडचिरोली निसर्गाच्या अलौकिक सौंदर्याने नटलेला आणि इतिहास-संस्कृतीने समृद्ध असा जिल्हा! घनदाट जंगल, खळाळणाऱ्या नद्या, फेसाळणारे धबधबे, गडकोट, वन्यजीव, विविध पक्षी, जैवविविधता प्राचीन मंदिरे आणि अनवट वाटा यामुळे हा जिल्हा निसर्गप्रेमी, साहसी पर्यटक आणि इतिहासप्रेमींसाठी एक अनोखे पर्यटनस्थळ ठरतो. जागतिक पर्यटनदिनानिमित्त गडचिरोली जिल्ह्यातील समृद्ध पर्यटनाचा घेतलेला आढावा




**गडचिरोलीचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व**

गडचिरोलीचा इतिहास राष्ट्रकूट, चालुक्य, यादव आणि गोंड राजवटींशी जोडलेला आहे. जिल्ह्याची निर्मिती २६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. या जिल्ह्यातील १२ तालुक्यांमध्ये वेगवेगळ्या ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा ठेवा आहे.

येथील आदिवासी समाज निसर्गपूजक असून, त्यांनी वनसंस्कृती जोपासत नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण केले आहे. त्यांची लोकसंस्कृती, जीवनशैली आणि परंपरा यामुळे गडचिरोलीचे वैविध्य अधिक खुलते.

**निसर्गरम्य धबधबे आणि नद्या**

गडचिरोली जिल्ह्यातून वाहणाऱ्या वैनगंगा, प्राणहिता, इंद्रावती आणि पर्लकोटा नद्यांमुळे हा भाग समृद्ध झाला आहे. या नद्यांच्या काठावर आणि घनदाट जंगलात अनेक सुंदर धबधबे आणि नयनरम्य स्थळे आहेत.

त्रिवेणी संगम, भामरागड पामुलगौतम, पर्लकोटा आणि इंद्रावती नद्यांचा संगम, हा जिल्ह्यातील सर्वोत्तम सनसेट पॉईंट आहे.

सोमनूर त्रिवेणी संगम (सिरोंचा): सिरोंचा तालुक्यातील सोमनूर येथे इंद्रावती, गोदावरी आणि अदृश्य असलेली अंतरवाहिनी या नद्यांचा संगम होतो. हे स्थळ धार्मिक आणि नैसर्गिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे.

वैनगंगा-वर्धा संगम (चपराळा): गडचिरोलीच्या चपराळा येथे वैनगंगा आणि वर्धा या दोन मोठ्या नद्या एकत्र येतात आणि त्यांना 'प्राणहिता' असे नाव मिळते. ही नदी पुढे तेलंगणात गोदावरीला मिळते.

दास खडका धबधबा, कुरखेडा सात पर्वतांमधून कोसळणारा हा धबधबा पावसाळ्यात विलोभनीय दिसतो.

जांभळी धबधबा, कोरची मानवी हस्तक्षेप नसलेला हा धबधबा एक अनवट पर्यटनस्थळ आहे.

देवलमारी धबधबा, अहेरी प्राणहिता नदीच्या काठावर असलेला हा धबधबा निसर्गाच्या कुशीत विसावलेला आहे.

जीतम व्हॅली आणि धबधबा, अहेरी उत्तराखंडच्या नदीकिनाऱ्यासारखा अनुभव देणारा हा परिसर पांढऱ्या शुभ्र खडकांनी नटलेला आहे.

**जंगल आणि जैवविविधतेचा खजिना**

गडचिरोली जिल्ह्यातील जंगल जैवविविधतेने समृद्ध आहे. येथे अनेक दुर्मिळ वनस्पती आणि वन्यजीव आढळतात.

ग्लोरी ऑफ आलापल्ली, अहेरी ११४ प्रकारची फुलझाडे आणि ५० हून अधिक प्रकारच्या वृक्षांनी समृद्ध असलेले हे जंगल जैवविविधतेचा अनमोल ठेवा आहे.

कमलापूर हत्ती कॅम्प, अहेरी महाराष्ट्रातील एकमेव शासकीय हत्ती कॅम्प येथे असून, पर्यटकांना हत्तींना जवळून पाहण्याची संधी मिळते.

कोलमार्का रानम्हैस अभयारण्य, अहेरी वन्यजीव निरीक्षणासाठी उत्तम पर्याय.

वाघाळा- स्थलांतरित पक्ष्यांचे गाव एप्रिल-मे महिन्यात येथे स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन होते, त्यामुळे पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी हे नंदनवन आहे.

ऐतिहासिक किल्ले आणि प्राचीन मंदिरे

गडचिरोली जिल्ह्यातील गोंड आणि नागवंशीय राजांनी उभारलेले किल्ले आणि मंदिरे ऐतिहासिक महत्त्व राखून आहेत.

वैरागड किल्ला, आरमोरी नागवंशीय राजांनी बांधलेला हा किल्ला खोबरागडी आणि वैलोचना नद्यांच्या संगमावर स्थित आहे.

टिपागड किल्ला, कोरची उंच डोंगरावर वसलेला हा किल्ला आणि त्यावरील बारमाही पाण्याचा तलाव पर्यटकांचे आकर्षण आहे.

झापरागड किल्ला, छत्तीसगड सीमेलगत अखंड दगडात कोरलेली ८ फूट उंच मारुतीची मूर्ती हे येथील वैशिष्ट्य.

सोमनूर संगम, सिरोंचा इंद्रावती आणि गोदावरी नद्यांच्या संगमावर वसलेले सोमेश्वर मंदिर धार्मिक पर्यटनासाठी महत्त्वाचे ठिकाण आहे.

मार्कंडा मंदिर, चामोर्शी 'विदर्भाची काशी' म्हणून ओळखले जाणारे हे मंदिर खजुराहो शैलीतील उत्कृष्ट शिल्पकृतींसाठी प्रसिद्ध आहे. येथे वैनगंगा नदी उत्तरवाहिनी झाल्यामुळे या मंदिराला विशेष महत्व आहे. त्यामुळे अनेक भाविक पूर्वजांच्या नावे वैनगंगा नदीमध्ये पवित्र स्नान करून मंदिरात दर्शनासाठी जातात.

याशिवाय आरमोरीतील राम मंदिर, भंडारेश्वर मंदिर, गोरजाई माता मंदिर, कुरखेडा तालुक्यातील एकाष्म पाशानावर ५०० फुट उंचावरील अरततोंडी शिवमंदिर, खोब्रामेंढा, मौशीखांब येथील मेघनाथ मंदिर सुरजागड येथील आदिवासिंचे दैवत ठाकूर-देव ही धार्मिक स्थळेही पर्यटकांचे आकर्षण आहे.

**आदिवासी संस्कृती आणि जीवनशैली**

गडचिरोली हा महाराष्ट्रातील आदिवासीबहुल लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. येथे गोंड, माडिया आणि कोरकू जमाती राहतात.

अबुजमाड नावाप्रमाणेच हा भाग रहस्यमय जंगल आहे हा भाग आजही आदिवासी जीवनशैली जपतो.

रेला नृत्य आदिवासी समाज पारंपरिक नृत्य करताना रंगीबेरंगी वेशभूषा आणि पारंपरिक वाद्ये वापरतो.

लेइंग लाल मुंग्यांची चटणी हा दुर्मिळ खाद्यपदार्थ आदिवासी संस्कृतीचा भाग आहे.

साहसी आणि इको-टूरिझमसाठी अनवट पर्यटनस्थळे

गडचिरोलीतील साहसी पर्यटकांसाठी काही अनोखी ठिकाणे आकर्षण ठरतात.

बाजागड संगीत निर्माण करणारे दगड येथे दगडांवर टाळी मारल्यास वेगवेगळे सुरेल ध्वनी निर्माण होतात.

लख्खामेंढा पहाडी, आलापल्ली ट्रेकिंगसाठी उत्तम असलेले हे डोंगर, महाभारतकालीन लाक्षागृहाच्या आख्यायिकेशी जोडले जातात.

मुतनूर हिल स्टेशन, चामोर्शी निसर्गाच्या सान्निध्यात ट्रेकिंगसाठी सर्वोत्तम जागा.

व्यंकटापूर येथील उसळत्या पाण्याचे कुंड येथे टाळ्या वाजवल्यास पाण्यात बुडबुडे निर्माण होतात, ही निसर्गाची अनोखी देणगी आहे.

गडचिरोली इको-टूरिझमसाठी मुख्य आकर्षण

गडचिरोली जिल्हा पर्यावरणपूरक पर्यटनासाठी आदर्श आहे. निसर्ग, संस्कृती आणि इतिहासाचा अद्वितीय संगम येथे आढळतो. येथील घनदाट जंगल, नद्या, धबधबे, ऐतिहासिक गडकोट आणि आदिवासी जीवनशैली पर्यटकांसाठी अपूर्व आनंद देतात. निसर्गाचा अनुभव घेत, साहसी पर्यटन, ऐतिहासिक स्थळदर्शन आणि वन्यजीव निरीक्षणासाठी गडचिरोलीला नक्की भेट द्या!

**- गजानन जाधव,**
जिल्हा माहिती अधिकारी,
गडचिरोली

# आरोग्यवर्धक मसाले: लवंग, दालचिनी आणि इलायचीचे अद्भुत फायदे



लवंग हा एक बहुगुणी मसाला आहे जो भारतीय स्वयंपाकात महत्त्वाची भूमिका बजावतो. जेवणाची चव वाढवण्याबरोबरच आरोग्यासाठीही लवंग अत्यंत फायदेशीर आहे. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे शरीरासाठी अनेक प्रकारे उपयोगी ठरतात. लवंग रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो आणि बॅक्टेरिया नष्ट करण्यासाठी उपयुक्त आहे.

लवंगाचे झाड हे सदाहरित असून त्याला *सिजीगियम एरोमॅटिकम* असे नाव आहे. लवंगाच्या झाडावर तयार होणाऱ्या फुलांच्या कळ्या वाळवल्यानंतर त्यांचा मसाल्याच्या स्वरूपात उपयोग होतो. लवंग पूर्ण किंवा पावडर स्वरूपात सहज उपलब्ध आहे. तो फक्त स्वयंपाकापुरता मर्यादित नाही तर औषधीय उपयोगांसाठीही प्रसिद्ध आहे. लवंग गरम पेय पदार्थ, कुकीज, केक यामध्ये मसालेदार चव आणि अत्तरासारखी उष्णता आणण्यासाठी वापरला जातो.

**लवंगाचे फायदे**

**पचनतंत्र सुधारते** – लवंगामध्ये पचन सुधारण्यासाठी महत्त्वाचे घटक असतात. उन्हाळ्याच्या दिवसांत उष्णतेमुळे पचनतंत्र बिघडण्याची शक्यता असते. अशा वेळी लवंगाचे पाणी पिणे फायदेशीर ठरते. रोज उपाशीपोटी लवंगाचे पाणी प्यायल्याने किंवा लवंग चघळल्याने ॲसिडिटी कमी होते आणि पचनतंत्र मजबूत होते.

**त्वचेसाठी फायदेशीर** – उन्हाळ्यात त्वचेवर होणाऱ्या सनबर्न, पुरळ, डाग यांसारख्या समस्यांसाठी लवंग उपयोगी आहे. लवंगामध्ये अँटी-एजिंग, अँटी-ऑक्सिडंट, आणि अँटी-फंगल गुणधर्म असल्यामुळे त्वचेच्या आरोग्यासाठी लवंगाचे पाणी किंवा तेल उपयुक्त ठरते. लवंगामुळे त्वचा निरोगी आणि तजेलदार होते.

**तोंडातील जखमांवर उपयोगी** – तोंडात छाले होणे ही सामान्य समस्या आहे, ज्यामुळे खाणे-पिणे त्रासदायक होते. अशा वेळी लवंगाचा तेल लावल्यान किंवा लवंग चघळल्याने जखमांवर परिणामकारक आराम मिळतो. लवंगामध्ये सूज कमी करणारे आणि जंतुनाशक गुणधर्म असल्यामुळे हे जलद परिणाम करते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते** – लवंगामध्ये अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी लवंग उपयुक्त आहे. हिवाळ्यात सर्दी-खोकल्यापासून संरक्षण करण्यासाठी लवंगाचा चहा किंवा काढा उपयोगी ठरतो.

**सांधेदुखी आणि सूज कमी करण्यासाठी** – लवंगामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असल्यामुळे सांधेदुखी किंवा शरीरातील सूज कमी करण्यासाठी लवंगाच्या तेलाने मसाज केला जातो.

**दालचिनीचे फायदे**

दालचिनी हा अजून एक बहुगुणी मसाला आहे जो झाडाच्या सालीपासून तयार होतो. हा केवळ स्वयंपाकात चव वाढवण्यासाठीच नाही, तर औषधीय गुणधर्मांसाठीही ओळखला जातो.

**रक्तातील साखर नियंत्रणात ठेवणे**– दालचिनीमधील घटक शरीरात इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारतात, ज्यामुळे शरीर इन्सुलिनचा अधिक प्रभावीपणे उपयोग करू शकते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होते. मधुमेह असलेल्या व्यक्तींनी दालचिनीचा समावेश आहारात केल्यास फायदेशीर ठरते.

**पचन सुधारते** – दालचिनीमध्ये पचन सुधारण्यासाठी उपयुक्त असे नैसर्गिक गुणधर्म आहेत. अपचन, गॅस किंवा ॲसिडिटीसाठी दालचिनीचा चहा फायदेशीर ठरतो.

**अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म** – दालचिनीमधील अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म शरीरातील जंतूसंसर्ग कमी करण्यासाठी उपयुक्त आहेत. यामुळे शरीराची प्रतिकारशक्तीही वाढते.

**वजन कमी करण्यास मदत** – दालचिनीमुळे मेटाबॉलिझम सुधारतो, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत मिळते. गरम पाण्यासोबत दालचिनी पावडर पिणे लाभदायक ठरते.

**इलायचीचे फायदे**

इलायची हा मसाल्यांचा राजा समजला जातो. यामध्ये अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असल्याने ते आरोग्यासाठी उपयुक्त आहे.

**पचनासाठी फायदेशीर** – इलायची पचन सुधारते आणि अपचन, गॅस यांसारख्या तक्रारींवर उपाय करते. जेवणानंतर इलायची चघळल्याने पचन सुधारते आणि तोंडाला ताजेतवाने वास येतो.

**हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त** – इलायचीमधील अँटीऑक्सिडंट्स हृदयविकाराचा धोका कमी करतात आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करतात.

**इम्यूनिटी वाढवते** – इलायचीमधील गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. नियमित इलायचीचे सेवन हिवाळ्यात सर्दी-खोकल्यासारख्या त्रासांपासून संरक्षण करते.

**तणाव कमी करण्यासाठी उपयुक्त** – इलायचीचा वास मनाला शांतता आणि ताजेतवानेपणा देतो. त्यामुळे मानसिक ताण कमी करण्यासाठी इलायची उपयुक्त ठरते.

लवंग, दालचिनी आणि इलायची हे केवळ स्वयंपाकघरातील मसाले नसून औषधीय गुणधर्मांनी परिपूर्ण आहेत. या मसाल्यांचा आहारात समावेश केल्याने शरीर निरोगी राहते, आणि अनेक आजारांवर त्यांचा प्रतिबंध होतो.

***

# थंडीत केस गळत आहेत? तर करा हे उपाय



थंडीचे दिवस सुरू झालेत त्यासोबतच केसगळतीही मोठ्या प्रमाणात होत आहे. येथे आम्ही काही तुम्हाला उपाय सांगत आहोत ज्याच्या मदतीने तुम्ही केस गळण्यापासून रोखू शकतो आणि चमकदार बनवू शकता. जसजशी थंडी वाढू लागते तसतशा अनेक समस्या निर्माण होऊ लागतात. यामुळे त्वचा कोरडी होणे, रॅशेस आणि सगळ्यात मोठी समस्या केस गळतीची होते.

थंड हवा आणि घराच्या आत हीटिंगमुळे केसांचे आरोग्य बिघडते. यामुळे ते निस्तेज होतात तसेच गळू लागतात. दरम्यान, थंडीच्या दिवसांत जर तुमचे केस गळत असतील तर काही जुने उपाय वापरून तुम्ही केसगळती रोखू शकता.

आवळ्याचा रस हा अनेक औषधीय गुणांसाठी ओळखला जातो. आवळ्याच्या रसामुळे तुमचे केस धुतल्यानंतर मुलायम आणि चमकदार होतात.

केसांची वाढ होण्यासाठी तुम्ही बदामाचे तेल आणि आवळ्याचा रस वापरू शकता. एका वाटीत थोडे बदामाचे तेल गरम करा आणि त्यात आवळ्याचा रस मिसळा.

हे मिश्रण स्काल्पवर गोलाकार पद्धतीने हळूहळू मालिश करा. यामुळे केसांच्या मुळांकडे व्यवस्थित लागेल. धुण्याच्या आधी १-२ तास हे मिश्रण लावा.

जर तुमचे केस निस्तेज झाले असतील तर ते सांभाळणे कठीण होते. यासाठी कोरफडीचे जेल वापरू शकता. नारळाच्या तेलामुळेही केसांना चांगले कंडिशनिंग मिळते. तसेच केस मजबूत होण्यास मदत होते.

# नसांमधून घाणेरडे कोलेस्ट्रॉल बाहेर काढून फेकणाऱ्या ७ हिरव्यागार भाजी







कोलेस्टेरॉलची पातळी वाढणे ही एक गंभीर आरोग्य समस्या आहे, ज्यामुळे हृदयरोग, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. औषधांच्या माध्यमातून कोलेस्टेरॉल नियंत्रित करता येत असले तरी आहारात बदल करून ते टाळता येऊ शकते. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी काय खावे? हिवाळ्यात मिळणाऱ्या हिरव्या पालेभाज्यांचा आहारात समावेश करणे हा कोलेस्ट्रॉलची पातळी सुधारण्याचा नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग आहे.

पालेभाज्यांमध्ये भरपूर पोषक असतात, त्यात जीवनसत्वे, खनिजे आणि फायबरसारखे घटक असतात, जे कोलेस्ट्रॉल आणि चयापचय नियंत्रित करतात. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ वर प्रकाशित केलेल्या अभ्यासात शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की हिरव्या पालेभाज्या खराब कोलेस्ट्रॉल कमी करू शकतात आणि शरीरासाठी आवश्यक चांगले कोलेस्ट्रॉल वाढवू शकतात, कसे ते जाणून घ्या...

**पालेभाज्यांमधील गुणधर्म**

हिरव्या पालेभाज्यांमधील विरघळणारे फायबर पचनमार्गात कोलेस्टेरॉल बांधून ते शरीरातून काढून टाकण्यास मदत करते

पालेभाज्यांमध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट रक्तवाहिन्यांमध्ये प्लेक तयार होण्यास प्रतिबंध करू शकतात

त्यामध्ये स्टेरॉल आणि स्टॅनॉल असतात, जे आतड्यात कोलेस्टेरॉल शोषण्यास प्रतिबंध करतात

पालेभाज्यांमध्ये कॅलरीज कमी असतात, त्यामुळे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते, वजन वाढणे हे याचे प्रमुख कारण आहे

पित्त ॲसिड तयार करण्यासाठी यकृत कोलेस्टेरॉलचा वापर करते. फायबर युक्त पालेभाज्या पित्त आम्ल उत्सर्जन वाढवतात

**मोहरीची पाने आणि कोबी**

हिवाळ्यात सरसो का साग आणि बाजरी रोटी अधिक खाल्ली जाते आणि त्याला कारणंही तशीच आहेत. मोहरीची पाने ग्लुकोसिनोलेट्सचा एक चांगला स्रोत आहे, जे केवळ कोलेस्ट्रॉल नियंत्रित करत नाही तर जळजळ कमी करते. हिवाळ्याच्या दिवसात मोहरीच्या पानांची भाजी खाल्ल्याने शरीराला योग्य उर्जाही मिळते. याशिवाय कोबी हा फायबरचा चांगला स्रोत आहे. याच्या सेवनाने हृदय निरोगी राहण्यास आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास मदत होते. त्यामुळे आपल्या आहारात याचा समावेश करून घ्यावा

**अरूगुला पाला**

ही हिरवी पालेभाजी तिच्या मसालेदार आणि तिखट अशा चवीसोबत फायटोकेमिकल्सचा उत्तम स्रोत आहे, ज्यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होण्यास आणि हृदय सुरक्षित ठेवण्यास मदत होते. हिवाळ्याच्या दिवसात तुम्ही या भाजीचा आहारात समावेश करून घेणं तुमच्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरते





**कोलार्ड ग्रीन आणि स्विस चार्ड**

कोलार्ड ग्रीनमध्ये भाज्या विरघळणारे फायबर आणि जीवनसत्वे आणि चा चांगला स्रोत आहेत. पित्त आम्लांना बांधून कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते. स्विस चार्ड बीटा-कॅरोटीन सारख्या अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे, जे ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ कमी करते. सलाड स्वरूपात तुम्ही या भाज्यांचा समावेश करून घेऊ शकता

**पालक आणि केल**

पालक, ल्युटीन आणि इतर कॅरोटीनोइड्सने समृद्ध, कोलेस्टेरॉलचे ऑक्सिडेशन प्रतिबंधित करते. यामध्ये असलेले पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. केल फायबर आणि ओमेगा -३ फॅटी ॲसिडने समृद्ध आहे, जे एलडीएल कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते. त्यात पित्त ॲसिड सिक्वेस्ट्रंट्स असतात, जे कोलेस्ट्रॉल कमी करतात आणि त्याशिवाय तुमचे हृदय चांगले राखण्यास मदत करतात

# वाढलेला रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित करा सूर्य नमस्कार, शरीराला होतील अनेक फायदे

राज्यभरात सगळीकडे थंडीचे वारे वाहू लागले आहेत. थंडी वाढू लागल्यानंतर वातावरणात अनेक बदल होण्यास सुरुवात होते. या दिवसांमध्ये सगळीकडे थंडगार वातावरण असते. थंडीच्या दिवसांमध्ये शरीराला गरम आहाराची आणि ऊबदार कपडे घालण्याची आवशक्यता असते. या दिवसांमध्ये वातावरणात सतत बदल होत असतात. त्यामुळे आरोग्य बिघडण्यास सुरुवात होते. वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेक लोक सकाळी उठून व्यायाम आणि योगासने करतात. मात्र थंडीच्या दिवसांमध्ये वातावरणात गारवा असल्यामुळे आरोग्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी. हिवाळा ऋतूमध्ये सकाळी उठल्यानंतर सूर्यनमस्कार केल्यास आरोग्याला अनेक फायदे होतील. बिघडलेले आरोग्य सुधारू लागेल. व्यायाम केल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. आज आम्ही तुम्हाला नियमित योगासने केल्यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.(फोटो सौजन्य-)

**सूर्यनमस्कार केल्याने शरीराला होणारे फायदे**

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत राहते**

बिघडलेली रोगप्रतिकारशक्ती निरोगी ठेवण्यासाठी नियमित योगासने करावीत. योगासने केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. सकाळी उठल्यानंतर नियमित सूर्यनमस्कार करावा. यामुळे रोगप्रतिकारशक्ती चांगली राहण्यास मदत होते. यामुळे आजारांपासून शरीराचा बचाव होतो. शिवाय शरीराचे रक्तभिसरण सुधारते आणि आरोग्य निरोगी राहते.

**हाडे मजबूत राहतात**

हाडांच्या निरोगी आरोग्यासाठी नियमित योगासने आणि सूर्यनमस्कार करावा. यामुळे हाडे मजबूत होतात आणि सांधे दुखीची समस्या कमी होते. त्यामुळे नियमित सूर्यनमस्कार करावा.

ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांपासून शरीराचा बचाव करण्यासाठी नियमित योगासने करावीत. सूर्यनमस्कार केल्यामुळे शरीरात निर्माण झालेली विटामिन डी ची कमतरता भरून काढण्यास मदत होते.

**वजन नियंत्रणात राहते**

वाढलेले वजन कमी करण्यासाठी तासनतास जिम आणि डाईट करण्याऐवजी नियमित सूर्यनमस्कार करावा. यामुळे वजन नियंत्रणात राहते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात.यामुळे कमी कॅलरीज बर्न होतात आणि वजन नियंत्रणात राहते.

**पचनसंस्था सुधारते**

बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यासाठी नियमित सूर्यनमस्कार करावा. यामुळे शरीरामध्ये सकारात्मक बदल दिसून येतात. बद्धकोष्ठता, ॲसिडिटी आणि अपचन इत्यादी पोटासंबंधित समस्यांपासून आराम मिळण्यास मदत होते.

**त्वचा सुधारते**

कमी वयातच अनेकांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या, बारीक रेषा आणि त्वचेसंबंधित इतर समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी नियमित सूर्यनमस्कार करावा. यामुळे त्वचेचे रक्तभिसरण सुधारते आणि त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतो. नियमित सूर्यनमस्कार केल्यामुळे त्वचेवर तेज येऊन चेहरा चमकदार आणि सुंदर दिसतो.

**चांगली झोप**

काहींना कितीही काम करून थकून आल्यानंतर सुद्धा चांगली झोप लागत नाही. चांगल्या झोपेसाठी अनेक लोक झोपेच्या गोळ्या खातात. पण असे करण्याऐवजी सूर्यनमस्कार केल्यास चांगली झोप लागेल. झोपेची गुणवत्ता सुधारून आरोग्याला अनेक फायदे होतील.



# पोटात अन्न सडून पचनाला होतोय त्रास, रोज खा भिजलेली मूगडाळ; कमालीचे शारीरिक फायदे

चांगले आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे आणि जे लोक त्यांच्या आरोग्याची काळजी घेतात ते नेहमी सुपरफूड म्हणून काम करू शकतील अशा पदार्थांच्या शोधात असतात. अशीच एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे मूग डाळ. मूगडाळीची आमटी ही तुम्ही नियमित आपल्या आहारात समाविष्ट करून घ्यायला हवी.

ही मूगडाळ जर तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येचा भाग बनवली तर तुमचे आरोग्य सुधारेल. पण तुम्ही रोज भिजवलेली मूग डाळ खाल्ल्यास त्याचा शरीरावर काय परिणाम होतो हे आपण या लेखातून जाणून घेऊया. भिजवलेल्या मुगडाळीचा शरीरावर काय परिणाम होतो याबाबत अधिक माहिती दिली आहे

**मूगडाळीचे आरोग्यदायी फायदे**

दीपलक्ष्मी, क्लेफ्ट अँड क्रॅनिओफेशियल सेंटर आणि श्री बालाजी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, चेन्नई येथील नोंदणीकृत आहारतज्ञ म्हणाल्या, "दररोज भिजवलेली मूग डाळ खाल्ल्याने तुमच्या शरीरासाठी अनेक फायदे होतात. त्यात भरपूर पोषक घटक असतात ज्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारते. एवढेच नाही तर मूगडाळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि संपूर्ण आरोग्य सुधारते.

मुगाची डाळ स्प्लिट ग्रीन हरभरा म्हणूनही ओळखली जाते आणि त्यात लोह, मॅग्नेशियम, तांबे, पोटॅशियम यासारखे आवश्यक पोषक घटक असतात आणि त्यात व्हिटॅमिन बी, ए, सी आणि भरपूर फायबरदेखील असते, ज्याचा शरीराला अधिक फायदा मिळतो.

**प्रोटीन आणि फायबरचे भांडार**

दीपलक्ष्मीच्या मते, भिजवलेली मूगडाळ ही प्रथिने आणि फायबरचा चांगला स्रोत आहे ज्यामुळे वजन कमी होण्यास आणि पचनास मदत होते. त्यांनी सांगितले की, "मूगडाळ भिजवल्याने त्यातील फायटिक ॲसिड नष्ट होते आणि त्यात लोह, जस्त आणि कॅल्शियमसारख्या पोषक तत्वांचे शोषण चांगले होते आणि मधुमेह असलेल्या लोकांसाठी हा एक चांगला नाश्ता आहे."

भिजवलेल्या मूगडाळमध्ये कॅलरीज कमी असल्याने कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते आणि हृदयाच्या आरोग्यालाही चालना मिळते. त्यामुळे नियमित भिजवलेली मूगडाळ खाण्याचा सल्ला देण्यात येतो.

# हिवाळ्यात जरूर खा डाळिंब, होतील जबरदस्त फायदे

*डाळिंब फळाला गुणांचा खजिना म्हटले जाते. हे खाण्यासाठी चांगले लागतेच मात्र त्यासोबतच त्याचे आरोग्यासही अनेक फायदे होतात. दररोज डाळिंबाचे सेवन केल्याने तुमच्या शरीराला अनेक आजारांपासून वाचवता येते आणि ते निरोगी राहते.*

*डाळिंबामध्ये फ्लेव्होनॉइड्स, फिनोलिक्स, व्हिटॅमिन सी, फायबर, लोह, पोटॅशियम, झिंक आणि ओमेगा -६ फॅटी ॲसिड हे पोषक घटक असतात, ज्यामुळे ते एक सुपरफूड बनते.*

*गर्भवती महिलांना डाळिंब खूप फायदेशीर मानले जाते. यामधील अँटिऑक्सिडेंट प्लेसेंटाचे संरक्षण करतात आणि मुलाच्या आरोग्यासाठी देखील चांगले असतात.*

*ज्या लोकांमध्ये लोहाची कमतरता आहे त्यांच्यासाठी डाळिंब हा चांगला पर्याय आहे. डाळिंबाच्या बियांमध्ये लोह मुबलक प्रमाणात आढळते, जे शरीरातील अशक्तपणा दूर करण्यास मदत करते.*

*हृदयविकारांपासून बचाव करण्यासाठीही डाळिंब खूप उपयुक्त आहे. त्यात अँटीहाइपरटेन्सिव्ह आणि अँटीएथेरोजेनिक गुणधर्म आढळतात, जे रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी आणि रक्तवाहिन्यांमध्ये साचलेला प्लेक कमी करण्यास मदत करतात.*



*डाळिंबात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात, ज्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत होते.*

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दोन दिवसीय लिंगभाव संवेदीकरण कार्यशाळा संपन्न

नाशिक दि.२९ (प्रतिनिधी)- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीतर्फे शुक्रवार दिनांक २६ आणि शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित दोन दिवसीय लिंगभाव संवेदीकरण कार्यशाळा' यशस्वीरित्या संपन्न झाली. कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा विद्यापीठातील विविध स्तरांवरील अधिकारी - कर्मचाऱ्यांमध्ये लिंगभाव समानतेविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे, कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ (पॉश कायदा) बद्दल सविस्तर माहिती देणे व कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी सुसंवादी निकोप वातावरण निर्मिती करणे हा होता. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यशाळेत पुणे विद्यापीठाच्या स्त्री आणि लिंगभाव शिक्षणशास्त्र विभागाच्या चार सदस्यीय चमूने विषय व सत्रनिहाय मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले तर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ संचालिका डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्या श्रीमती हेमलता पटवर्धन, सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठाच्या स्त्री आणि लिंगभाव शिक्षणशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. स्वाती द्याहाडराव, डॉ. स्नेहा गोळे, डॉ. ललित भवरे व प्रा. दीपा टाक, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समितीच्या पीठासन अधिकारी डॉ. माधुरी सोनवणे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत होती.

आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी स्त्री पुरुष यांच्यात समानता निर्माण व्हावी यासाठी कुटुंब ही सर्वात महत्वाची शाळा आहे. प्रत्येक मातेने लहानपणापासून आपल्या मुलांमध्ये सर्वांप्रती समान वागणुकीची भावना निर्माण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादित केले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन यांनी आपल्या कार्यशाळा समारोपाच्या भाषणात स्त्री पुरुष असा भेद न ठेवता सर्वांप्रती समान भावना ठेवण्यासाठी प्रत्यक्षात सकारात्मक कृतीची गरज व्यक्त केली. पूर्वापार भारतीय संस्कृती व समाजात स्त्रीला पुरुषापेक्षा उच्च स्थान देण्यात आल्याचे त्यांनी उदाहरणांसह सांगितले. विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या सदस्या श्रीमती हेमलता पटवर्धन यांनी भारतीय समाजात अधिकार सर्वांना



कळतात पण जबाबदारीची जाणीव त्याप्रमाणात नसते अशी खंत व्यक्त केली.

कार्यशाळेत लिंगभाव समानतेचे महत्त्व, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, निवारण) कायदा २०१३ (पॉश कायदा) : एक ओळख, लिंगभाव समानता आस्थापनेमध्ये व्यवहारात आणावयाची कशी?, विशाखा कायदा, राजस्थानातील भंवरीदेवी न्यायालयीन प्रकरण याविषयीची माहिती देण्यात आली. तसेच व्याख्यान, चर्चासत्र, प्रश्नोत्तरे, प्रत्यक्ष कृती व विविध खेळातून प्रबोधन करण्यात आले. समारोप प्रसंगी सहभागी सदस्य श्री. भाऊसाहेब डांगे, श्रीमती दिपाली तायडे, हृषीकेश पवार, प्रा. राजकुमार ननावरे यांनी कार्यशाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. समिती सदस्य श्री. राजेंद्र वाघ यांनी मान्यवरांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन समिती सदस्य सौ. संगीता देशपांडे व डॉ. भागवत चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन डॉ. माधुरी सोनवणे यांनी केले.

कार्यशाळेसाठी विद्यापीठातील सर्व विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, अधिकारी कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी आणि शेतमजूर उपस्थित होते.

# कारागृह सजा नव्हे तर सुधारणागृह - १०८ श्री विरंजनसागर गुरुदेव

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- वाईट संगतीमुळे मानव दुष्कृत्य करतो. संतांसह पोलिसांचा उद्देश एकच असतो. जेलर हे आईप्रमाणे असतात. साधूसंत लोकांचे हृदय परिवर्तन करण्यासाठी येतात. त्यासाठी सत्कार्य करून खरे मानवतावादी जीवन जगा असे अवाहन उपाध्याय श्री विरंजनसागर गुरुदेव यांनी केले.

व्यसनामुळे सर्वनाश होतो, त्यामुळे दारू व्यसनाचा त्याग करा सांगून गुरुदेवांनी कैद्यांना दारूचे व्यसन सोडायला लावले. हर्सूल कारागृह येथे शुक्रवारी दुपारी उपाध्याय विरंजनसागर गुरुदेव कैद्यांना मार्गदर्शन करत होते. श्रीकृष्णाचा जन्म सुद्धा तुरुंगातच झाला, परंतु त्यांनी चांगली कामे केली. लोभाचे बंधन वाईट असते. शिक्षा ही सुधारणेसाठीच असते. पोलिस काठी घेऊन तर साधूसंत पिछी,कमंडलू घेऊन सत्कार्याचे शिक्षण देतात. एका छोट्याशा चुकीच्या वर्तणुकीमुळे आई-वडील भाऊ-बहीण यांच्या डोळ्यात अश्रू आणून त्यांच्या आकांक्षा आपण धुळीस मिळवतो. असेही गुरुदेव म्हणाले.

याप्रसंगी कारागृह प्रशासनाचे श्री अनिल खामकर साहेब, श्री सचिन साळवे साहेब, श्री संदीप भूपेकर साहेब, राजेंद्र जाधव साहेब, तसेच अमित गंगवाल, प्रकाश ठोळे, अशोक अजमेरा,निलेश काला, पंकज छाबडा, सुमित गंगवाल, योगेश ठोले निलेश बडजाते, शुभम पांडे, शितल पाटणी, मुकेश गंगवाल, अमोल कासलीवाल, संतोष काला, आतिश काला, संतोष पापडीवाल, आदी उपस्थित होते. अशी माहिती पियुष कासलीवाल, नरेंद्र अजमेरा, प्रशांत शहा यांनी दिली.

# महाराष्ट्रात २४ तासांत मुसळधार पावसाचा कहर; धरणे तुडुंब, विसर्ग वाढला, मंत्री गिरीश महाजन यांचे सतर्क राहण्याची प्रशासनास सूचना

छत्रपती संभाजीनगर दिदि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्यामध्ये गेल्या २४ तासांपासून मुसळधार पावसाचा जोर कायम असून अनेक जिल्ह्यांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे, तर शहरी भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राज्यातील बहुतांश धरणांमध्ये जलसाठा धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचल्याने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरी, कृष्णा, पंढरा, गिरणा, भिमा, यांसह अनेक नद्या तुडुंब भरून वाहत आहेत. नदीकाठावरील गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला असून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचे सूचना मंत्री गिरीश महाजन यांनी प्रशासनास दिलेल्या आहेत. काही भागात पाण्याच्या विसर्गामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

राज्यातील मोठे प्रकल्प जायकवाडी ,हातनूर, गोसीखुर्द, कोयना, उजनी, गंगापूर ,गिरणा, पूर्ण क्षमतेने भरले आहेत या धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे. या परिस्थितीची गंभीर दखल घेत मंत्री गिरीश महाजन यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

"ज्या ठिकाणी नागरिक अडकले आहेत, तेथे प्राधान्याने बचाव कार्य हाती घ्यावे. कोणत्याही भागात मदतीस विलंब होऊ नये," असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच पूरग्रस्त नागरिकांना तातडीने मदत पोहोचवावी, अशीही सूचना त्यांनी केली. उपरोक्त परिस्थितीबाबत माहिती राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेली असून मुख्यमंत्री परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले आहे.

# वीजबिल शून्य करणाऱ्या पीएम-सूर्यघर योजनेचा लाभ घ्या

## महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांचे आवाहन, सौर ग्राहकांचा सुसंवाद मेळावा उत्साहात

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- पारंपरिक औष्णिक वीजनिर्मितीसाठी लागणारे कोळशाचे साठे कमी चालले होत आहेत. त्यामुळे मोफत मिळणारी व पर्यावरणास पूरक सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. पीएम-सूर्यघर योजनेत घरगुती ग्राहकांना छतावर वीजनिर्मितीसाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान तसेच वीजबिल शून्य करण्याची संधी मिळते. त्यामुळे जास्तीत जास्त ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी केले.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीतील सेवा पर्वानिमित्त महावितरण व ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सौर ग्राहकांसाठी शुक्रवारी (२६ सप्टेंबर) तापडिया नाट्यमंदिरात आयोजित सुसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, गिरीश गायकवाड, जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष गोविंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्य अभियंता कछोट म्हणाले की, मराठवाड्यात पावसाचे ३० ते ३५ दिवस वगळता वर्षभर मुबलक सूर्यप्रकाशामुळे सौर ऊर्जेला प्रचंड वाव आहे. एक किलोवॅटला ३० हजार, दोन किलोवॅटला ६० हजार आणि तीन किलोवॅटच्या पुढे कमाल ७८ हजार रुपये अनुदानामुळे ग्राहकांचा योजनेकडे कल वाढला आहे. यासाठी महावितरणने सर्व प्रक्रिया ऑनलाईन केलेली आहे. तथापि, शहरात साडेतीन लाख वीजग्राहक असताना केवळ १३ हजार लोकांनी सौर संच बसवले आहेत. या ग्राहकांनी परिचितांना सौर ऊर्जेचे फायदे सांगून सूर्यघर योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. परिमंडलात रोज ८३ मेगावॅट सौर ऊर्जानिर्मिती होते. सोलर एजन्सीजने ठरवले तर या सेवा पर्वात येत्या २ ऑक्टोबरपर्यंत आपण १०० मेगावॅटचा पल्ला गाठू शकतो. एंड्युरन्स कंपनीने पोफळा गावात सर्व ग्राहकांना सौर संच पुरवून हे जिल्ह्यातील पहिले सौरग्राम केले आहे. प्रत्येक सोलर एजन्सीने सामाजिक बांधिलकी म्हणून १ किलोवॅट सौर संच मोफत बसवून दिल्यास ३० ते ४० ग्राहकसंख्या असलेली ३ ते ४ गावे सौरग्राम होऊ शकतील, असे मुख्य अभियंता कछोट म्हणाले.

सौरऊर्जा निर्मिती करणारे ग्राहक लक्ष्मण देशमुख, सतीश शेलार, प्रशांत आमटे, श्रीराम केकाण, जगदीश ढाकणे, सुशील जोशी, योगेश काबरा, पंडित गायके, कचरू काळे, संतोष बक्षी, डॉ. राजशेखर दडके, प्रतेश पटेल तसेच



महावितरणच्या सहायक अभियंता सरिता मेंडके, कोमल जाधव, जोहरा खान, शीतल कठाळे, अश्विनी डाके यांचा यावेळी गौरव करण्यात आला. उत्कृष्ट सौरऊर्जा पुरवठादार म्हणून विल एन्टरप्रायझेस, बी.जी. सोलार, हृषिकेश इंजिनिअर्स, एम. जी. कॉर्पोरेशन, युनिव्हर्सल सोलार, पाटील इलेक्ट्रोमेक सोलार, सेझोनंट टेक्नोलॉजीज, आर. एस. एन्टरप्रायझेस, एसएनएस सोलार सोल्युशन्स व ज्युपिटर सोलार यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनचे मनोज गवंडर, मंगेश बनसोड, मंदार देशपांडे, रामप्रसाद आव्हाड, रवी बोबडे, ज्ञानेश्वर पाटील, प्रसाद लोंढे, नितीन जाधव, राहुल बोर्डे, अमित पाटणी व सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मुक्त विद्यापीठ व्यवस्थापन मंडळावर तीन नवे सदस्य डॉ. गुजराथी, डॉ. निकुंभ व फडणवीस यांची नियुक्ती

नाशिक दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे राज्यपाल आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलपती माननीय श्री आचार्य देवव्रत यांनी विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर तीन महत्वपूर्ण व्यक्तींची नेमणूक केली आहे. डॉ. गुजराथी दत्तात्रय मनोहर, डॉ. अक्षया निकुंभ व श्री प्रसेनजित श्रीकृष्ण फडणवीस अशी नियुक्त सदस्यांची नावे आहेत. ही नेमणूक तीन वर्षांसाठी असणार आहे. विद्यापीठ अधिनियम १९८९ नुसार व विद्यापीठाचा कारभार अधिक पारदर्शक व विश्वासार्ह्य व्हावा यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

मुक्त विद्यापीठ व्यवस्थापन मंडळावर निवड झालेले सदस्य डॉ. गुजराथी दत्तात्रय मनोहर हे पीएच.डी., एम.फिल., एम. कॉम. आणि बी.कॉम. यांसारख्या उच्च पदव्या विशेष प्रावीण्यासह मिळवलेले व्यवस्थापन आणि वाणिज्य क्षेत्राचे तज्ज्ञ व्यक्ति आहेत. त्यांना या क्षेत्रात ३८ वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी नाशिक येथील अशोका बिझनेस स्कूलचे संचालक आणि अशोका सेंटरचे प्राचार्य म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्यांना पुणे विद्यापीठातील सर्वो त्कृष्ट वाणिज्य शिक्षक म्हणून जी.बी. कुलकर्णी पुरस्काराने गौरवण्यात आले आहे, तसेच त्यांनी पुणे विद्यापीठाच्या कॉस्टिंग, अकाउंटन्सी, बीबीए बोर्डाचे माजी अध्यक्ष आणि शैक्षणिक परिषदेचे माजी सदस्य म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ते एक यशस्वी संशोधक मार्गदर्शक असून, त्यांनी ९ पीएच.डी. व ६ एम.फिल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांचे २५ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाले आहेत; याव्यतिरिक्त, ते सहकार भारती, नाशिकचे उपाध्यक्ष, वेगो लायब्ररी फाउंडेशनचे प्रकल्प संचालक अशा विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यांमध्ये सक्रिय आहेत.ते अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील एस. एन. आर्ट्स, डी. जे. एम. कॉमर्स आणि बी. एन. एस. सायन्स महाविद्यालयात कार्यरत आहेत.

दुसऱ्या तज्ज्ञ व्यक्ति डॉ. अक्षया निकुंभ यांची निवड संशोधन क्षेत्रातून झाली आहे. त्या भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (आयआयटी बॉम्बे) येथील हवामान अभ्यास केंद्रात सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर येथून हवामान आणि महासागर विज्ञानात पीएच.डी. पूर्ण केली असून, त्यांना त्यांच्या सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठी रॉडम कुटुंब पदक मिळाले आहे. यापूर्वी, त्यांनी प्रिन्सटन विद्यापीठ आणि - मध्ये पोस्टडॉक्टोरल संशोधन सहकारी म्हणून काम केले आहे. मोठ्या प्रमाणातील हवामान गतिकी, पर्जन्य तीव्रता आणि मान्सून हे त्यांच्या संशोधनाचे मुख्य विषय असून, त्यांचे महत्त्वपूर्ण शोधकार्य जिओफिजिकल रिसर्च लेटर्स आणि जर्नल ऑफ ॲटमॉस्फेरिक सायन्स यांसारख्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहे. त्यांना यंग फॅकल्टी पुरस्कार ( बॉम्बे २०२४), पोस्टडॉक्टोरल फ ेलोशिप आणि फुलब्राइट कलाम हवामान फेलोशिप यांसारखे अनेक महत्त्वाचे पुरस्कार आणि फेलोशिप्स प्राप्त झाले आहेत. त्या सध्या मान्सून मिशन फेज अंतर्गत एका मोठ्या संशोधन प्रकल्पात सह-मुख्य अन्वेषक म्हणून कार्यरत आहेत.

तिसरे तज्ज्ञ व्यक्ति श्री. प्रसेनजित श्रीकृष्ण फडणवीस यांची पार्श्वभूमी औद्योगिक क्षेत्रातील आहे. ते पुण्यात एसपीपीयू एज्युटेकचे संचालक आहेत. ते सायबर सुरक्षा व बौद्धिक संपदा विषयातील तज्ज्ञ आहेत. विद्यार्थी दशेपासून श्री. फडणवीस अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. २०१७-२०२२ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे ते सदस्य होते. तसेच याच विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य म्हणून गेली आठ वर्षे ते कार्यरत आहेत. अधिसभेत विविध विषयांवर त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे.

> राज्यपाल यांनी मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर डॉ. गुजराथी, डॉ. निकुंभ व श्री. फडणवीस या तीन अनुभवी, तज्ज्ञ व कार्यक्षम व्यक्तींची नियुक्ती केली आहे. त्यांचे विद्यापीठ परिवारात स्वागत आहे. या नव्या सदस्यांमुळे मुक्त विद्यापीठाला त्यांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील अनुभवाचा फायदा मिळणार आहे. तसेच विद्यापीठाच्या प्रगतीचा मार्ग अधिक प्रशस्त होणार आहे.
>
> **-प्रा. संजीव सोनवणे**
> मा. कुलगुरू
> यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



# स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी ऑनलाईन माहिती द्या एक लाख रुपये बक्षिस मिळवा

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर,आरोग्य विभागा मार्फत सर्व नवरात्र मंडळे, स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना शिबिर व कर्णपुरा यात्रे मध्ये PCPNDT कार्यक्रमा अंतर्गत गर्भलिंग निदान व स्त्रीभृणहत्या याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

"स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी आता द्या ऑनलाइन माहिती आणि मिळवा एक लाख बक्षीस!"

अवैधरित्या होणारे गर्भपात व प्रसूतिपूर्व गर्भलिंग निदान चाचणी रोखण्याच्या दृष्टीने व गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित कायदा २००३ व एम.टी.पी. कायदाची प्रभावापण अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने " आमची मुलगी http:// amchimulgimaha in हे संकेतस्थळ सुरु केले आहे. या संकेतस्थळावर कोणीही गर्भलिंग निदान व अवैध गर्भपाताबाबतच्या तक्रार नोंदव शकत. तसेच तक्रार नोंदविण्यासाठी संकेतस्थळा बरोबर १८००२३३४४७५ व १०४ हा

टोल फ्रि क्रमांक विकसित करण्यात आलेला आहे. संकेतस्थळावर व टोल फ्रि क्रमांकावर तक्रार नोंदविल्यास तक्रारदाराचे नाव गोपनीय राहिल परंतु तक्रारदाराची इच्छा असल्यास त्यांचे नाव देखील नोंदवू शकतात. तक्रारदारांनी दिलेल्या माहिती नुसार पी.सी.पी.एन.डी.टी. कायदयाची अंमलबजावणी होऊन जर स्त्रीभृणहत्या रोखण्यास यश आले तर तक्रारदारास शासनामार्फत खबरी बक्षीस योजने अंतर्गत एक लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. न्यायालयात केस दाखल झाल्यावर ही रक्कम दिली जाते.

# विकास निधी कमी पडू देणार नाही, शिऊर येथील कार्यक्रमात पालकमंत्र्यांची ग्वाही

शिऊर दि.२९ (प्रतिनिधी)- शिऊर येथील आनंद कौशल्याय बुद्ध विहार मंडळासाठी एक कोटी रुपयांच्या सांस्कृतिक सभागृह व बुद्ध विहार बांधकामाचे भूमिपूजन पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. आमदार प्रा. रमेश बोरणारे यांच्या विशेष प्रयत्नातून सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या निधीतून हे काम मंजूर झाले. पूज्य भंते बोधिधम्मा थेरो, भंते पत्रवंत, भंते पत्रजीत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

मंत्री शिरसाट म्हणाले, विकासासाठी कितीही निधी मागा, कमी पडू देणार नाही. मात्र अशी कामं करा, जी आयुष्यभर लक्षात राहतील. या ठिकाणी अभ्यासिका उभारली जात आहे. यातून अभ्यास करून मुलं मोठे अधिकारी बनली, तर त्यांचा आनंद आणि आठवण कायम राहील. त्यामुळे हे पुण्याचं काम ठरेल. या गावाशी माझे जुने संबंध आहेत. कोण किती दिवस पदावर होता, यापेक्षा पदावर असताना काय काम केलं, हे लोक लक्षात ठेवतात. एक कोटी काय, आणखी निधी लागला तरी देऊ, असेही त्यांनी सांगितले. आमदार बोरणारे म्हणाले, सभागृह होईल की नाही, याबाबत शंका होती. मात्र मी शब्दाला जागणारा आमदार आहे. माझ्या शब्दावर विश्वास ठेवा, अशी ग्वाही दिली होती. आज त्या शब्दाला अनुसरून एक कोटींच्या सभागृहाचे भूमिपूजन झाले. वैजापूर तालुक्यातील मोठ्या वस्त्यांमध्ये अशा प्रकारची सामाजिक सभागृहं उभारण्याचा मानस आहे. कार्यक्रमाला माजी उपनगराध्यक्ष साबेरभाई, बाजार समितीचे सभापती रामहरी जाधव, डॉ. जे. के. जाधव, भागीनाथ मगर, आनंद निकम, नवनाथ निमसे, सरपंच किरण झिंजुर्डे, उपसरपंच नंदकिशोर जाधव, माजी सरपंच चंद्रशेखर खांडगौरे, नितीन चुडीवाल, भास्कर जाधव, राजेंद्र जाधव, बाळू पवार, कांताबाई पगारे, वाल्मीक भावसार, कारभारी जाधव आदी उपस्थित होते. भरपाई देण्यासाठी निवेदन शिऊर व परिसरात संततधार होत असलेल्या पावसामुळे परिसरातील शेती पिक पाण्याखाली येऊन उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांना तातडीने पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात यावे, यासाठी शिऊर ग्रामपंचायत, विकास सोसायटी व सामाजिक कार्यकर्त्यांनी पालकमंत्री शिरसाट यांना निवेदने दिली.